महाराष्ट्र शासन
ग्राम विकास विभाग

**संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण यांचे कार्यालय**

४ था मजला, दक्षिण कक्ष, सिडको भवन, सीबीडी-बेलापूर, नवी मुंबई - ४०० ६१४.

दूरध्वनी क्र. ०२२-२७५६१८२४/ टोल फ्री क्र. ०१९ २२२१८०० Website : www.mahaawaas.org
Email ID : directoriayruralhousing@gmail.com Maha Awaas :

**क्र.राव्यक-ग्रागृ/आय.टी./पीएम-जनमन/१९७३/२०२४** **दि. ३०/०९/२०२४**

प्रति,

**मा. आयुक्त,**
आदिवासी विकास विभाग,
आदिवासी विकास भवन,
नाशिक.

**विषय:- प्रधानमंत्री-जनजाती आदिवासी न्याय महाअभियान (PM-JANMAN) अंतर्गत जिल्ह्यांची माहिती कळविणेबाबत.**

**संदर्भ:-** १) या कार्यालयाचे पत्र क्र.SMURH/IT/२०२४/२५६, दि.०६/०२/२०२४.
२) मा.श्री.गया प्रसाद, उप महानिदेशक, ग्रामीण विकास मंत्रालय, भारत सरकार यांचेकडील पत्र क्र.DO.No.J-11013/2/2023-Pol.(386669) दि.०८/०२/२०२४.

उपरोक्त संदर्भ क्र.१ अन्वये, प्रधानमंत्री जनजाती आदिवासी न्याय महाअभियान (PM-JANMAN) अंतर्गत चंद्रपूर, नांदेड, नाशिक, पालघर, पुणे, रायगड, रत्नागिरी, सातारा, सिंधुदुर्ग, ठाणे व यवतमाळ या ११ जिल्ह्यांव्यतिरिक्त अहमदनगर, अमरावती, गडचिरोली व वर्धा या ४ जिल्ह्यांकडूनही माहिती प्राप्त झाली असून, ती आवास सॉफ्ट प्रणालीवर समाविष्ट करण्यात आलेली आहे. परंतु अहमदनगर, अमरावती, गडचिरोली व वर्धा या जिल्ह्यांना तसेच उर्वरित जिल्ह्यात नव्याने समाविष्ट झालेल्या ग्रामपंचायतींना आदिवासी व्यवहार मंत्रालय (MoTA), भारत सरकार यांच्या गती शक्ती डेटावेस मध्ये समाविष्ट नसलयाने, सदर ४ जिल्ह्यातील तसेच उर्वरित जिल्ह्यात नव्याने समाविष्ट झालेल्या ग्रामपंचायती मधील PVTG कुटुंबांना मंजूरी देणे शक्य होत नाही. याबाबत आदिवासी व्यवहार मंत्रालय, भारत सरकार यांना आपले स्तरावरुन कळविण्याविषयी संबंधितांना सूचना देण्यावावत विनंती केली होती.

संदर्भ क्र.२ अन्वये, मा.श्री. गया प्रसाद, उप महानिदेशक, ग्रामीण विकास मंत्रालय, भारत सरकार यांनी असे कळविले आहे की, आदिवासी व्यवहार मंत्रालयाने गती शक्ती डेटाबेस मध्ये समाविष्ट नसलेल्या ग्रामपंचायतींना मान्यता दिलेली नसल्याने, प्रधानमंत्री जनजाती आदिवासी न्याय

महाअभियान (PM-JANMAN) अंतर्गत सोबत जोडलेल्या यादीतील नव्याने समाविष्ट झालेल्या ग्रामपंचायती मधील कुटुंबांना मंजूरी देता येत नाही. त्यामुळे सदर ग्रामपंचायतींची माहिती आदिवासी व्यवहार मंत्रालयाच्या गती शक्ती डेटाबेस मध्ये समाविष्ट करणे आवश्यक आहे.

तरी सोबत जोडलेल्या यादीतील ग्रामपंचायतींची माहिती आदिवासी व्यवहार मंत्रालयाच्या गती शक्ती डेटाबेस मध्ये समाविष्ट करण्याबाबत आपलेस्तरावरुन संबंधितांना सूचना द्यावत, ही विनंती.

**सोबत :** आदिवासी व्यवहार मंत्रालय, भारत सरकार यांना कळविण्यासाठी ग्रामपंचायतींची यादी.

**(नीलेश सुमन केशव काळे)**
उप संचालक
राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण
महाराष्ट्र राज्य

**प्रत :-**

१. मा.प्रधान सचिव, ग्रामविकास व पंचायत राज विभाग, बांधकाम भवन, मुंबई यांना माहितीस्तव सविनय सादर.
२. मा. सचिव, आदिवासी विकास विभाग, महाराष्ट्र शासन यांना माहितीस्तव सविनय सादर.
३. मा.विभागीय आयुक्त, विभागीय आयुक्त कार्यालय, (सर्व) यांना माहितीस्तव सविनय सादर.
४. मा.कार्यकारी अध्यक्ष, तथा मुख्य कार्याकरी अधिकारी, जिल्हा परिषद, चंद्रपूर, नांदेड, नाशिक, पालघर, पुणे, रायगड, रत्नागिरी, सातारा, सिंधुदुर्ग, ठाणे, यवतमाळ, अहमदनगर, अमरावती, गडचिरोली व वर्धा यांना माहितीस्तव.
५. मा.उपायुक्त (विकास), विभागीय आयुक्त कार्यालय, (सर्व) यांना माहितीस्तव.
६. मा.अतिरिक्त आयुक्त, आदिवासी विकास विभाग, आदिवासी विकास भवन, नाशिक यांना माहिती व पुढील कार्यवाहीस्तव सादर.
७. प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, चंद्रपूर, नांदेड, नाशिक, पालघर, पुणे, रायगड, रत्नागिरी, सातारा, सिंधुदुर्ग, ठाणे, यवतमाळ, अहमदनगर, अमरावती, गडचिरोली व वर्धा यांनी आपल्या जिल्ह्यांची यादी प्रकल्प अधिकारी, एकात्मीक आदिवासी विकास प्रकल्प यांना पुढील कार्यवाहीसाठी द्यावी.